IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Impact Factor: 7.53

Volume 4, Issue 3, March 2024

# सेंद्रिय शेती : शाश्वत शेती पद्धती आणि ग्रामीण विकासासाठी रोजगार व स्वयंरोजगार निर्मितीची संधी

**डॉ. दत्तात्रय अर्जुन चव्हाण**

**अर्थशास्त्र विभाग,**

ज्ञानेश्वर ग्रामोन्नती मंडळाचे, मा. बाळासाहेब जाधव कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

आळे ता.जुन्नर जि.पुणे.

chavandatta09@gmail.com

**गोषवारा :-**

कृषिप्रधान **भारत देशातील** अर्थव्यवस्थेचा **कणा समजल्या जाणारी शेती आणि** शेतीतील **समस्या दिवसेंदिवस गंभीर** बनत **आहेत.** स्वातंत्र्यप्राप्तीनंतर **नियोजन काळात देशातील अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ** घडून **आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले गेले त्याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून 19 66 मध्ये देशात शेती क्षेत्रात अमुलाग्र बदल घडून आणणारी हरितक्रांती घडून आली. डॉ. स्वामीनाथन आणि प्रा. नॉर्मन बोरलॉग** यांनी केलेल्या शिफारशीनुसार **शेती** उत्पादनात **वाढ** घडवून **आणण्यासाठी हरितक्रांती नंतरच्या आधुनिक शेती पद्धतीत रासायनिक खते, कीटकनाशके, बुरशीनाशके, तणनाशके यांचा शेतीत भरमसाठ वापर** होऊ लागल्याने **दिवसेंदिवस पर्यावरणाचे संतुलन बिघडत** आहे. **जमिनीतील जैविक घटकांचा विनाश झाल्यामुळे जमिनी मृतवत झाल्या आहेत.** रासायनिक **खतांचा अधिक** वापर आणि वाढत्या किंमतीमुळे **उत्पादन** खर्चात **वाढ होऊन शेतकऱ्यांवर कर्जाचा बोजा वाढून नैराश्यापोटी प्रसंगी आत्महत्या करण्याची वेळ शेतकऱ्यांवर** येत **असल्याचे दिसून येत आहे. तसेच कीटकनाशके, बुरशीनाशके, तणनाशके इत्यादी रसायनांचा भरमसाठ वापरामुळे मित्र किडींचा नाश झाला आहे आणि शत्रुकिडींमध्ये प्रतिकारक्षमता निर्माण झाली. पर्यावरणाचे संतुलन बिघडले गेले परिणामी पिके रोगास बळी पडू लागली. त्यावर नियंत्रणासाठी रसायनांचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढत जाऊन या भरमसाठ किंमतीच्या रसायनांच्या वापरामुळे उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणावर वाढला. मात्र उत्पादन त्या तुलनेत घटले. त्यामुळे शेती परवडेनाशी झाली आहे आणि उत्पादित मालात विषारी अंश असल्याने त्याचा मानवाच्या आरोग्यावरही अनिष्ट परिणाम झाला.**

**शेतीच्या उत्पादन खर्चात बचत** करून **शेतीची उत्पादकता वाढविल्याशिवाय आजची शेती किफायतशीर होणार नाही आणि हे रासायनिक शेतीत शक्य नाही.** त्यासाठी ऋषीमुनींच्या काळापासून भारताला अवगत असणारी सेंद्रिय शेती पद्धत रामबाण उपाय ठरू शकते. **सेंद्रिय शेती पद्धतीसाठी आवश्यक असणाऱ्या** बहुतांशी **निविष्ठा शेतातच शेतकऱ्यांना तयार करता येतात त्यामुळे अनावश्यक उत्पादन खर्च मोठ्या**

**प्रमाणावर कमी होतो.** सेंद्रिय शेती पद्धतीमुळे **शेती क्षेत्राचा** व ग्रामीण भागाचा **शाश्वत विकास घडवून आणण्यासाठी ग्रामीण जनतेला व शेतकऱ्यांना स्वयंरोजगार आणि रोजगार निर्मान** करता येतो. **म्हणून रासायनिक शेतीच्या तुलनेत सेंद्रिय शेती कमी खर्चाची, शेतकऱ्यांना परवडणारी व रोजगार निर्मिती करणारी आणि ग्रामीण** जनतेच्या उत्पन्नात वाढ घडवून आनंदासाठी **व शाश्वत विकास साधण्यासाठी उपयुक्त ठरेल.**

**जागतिकीकरणात मागणीनुसार मालाचा पुरवठा या तत्वाने काळाची गरज ओळखून शेतकऱ्यांनी आता परत सेंद्रिय शेतीकडे वळणे गरजेचे बनले आहे. सेंद्रिय शेती ही आपली जुनीच परंपरा असल्याने शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती करणे निश्चितच आवडेल आणि ते** सजीव सृष्टी, **पर्यावरण, मानवी आरोग्य व शेतकऱ्यांनाही आर्थिक फायद्याचे ठरेल.**

**प्रस्तावना :-**

**भारता कृषिप्रधान देश आहे. प्राचीन काळापासून शेती हा भारतीयांचा महत्वपूर्ण प्रमुख व्यवसाय आहे. तसेच देशातील जवळपास 60 ते 65 टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून असल्याचे पहावयास मिळते. म्हणून सहाजिकच या क्षेत्राकडे जाणिवपूर्वक लक्ष देणे महत्त्वपूर्ण ठरेल. वाढत्या लोकसंख्येच्या वाढत्या मागणीचा प्रश्न सोडविण्यासाठी शेती क्षेत्रात हरित क्रांतीच्या माध्यमातून संकरित बी-बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके यांचा वापर करून अन्नधान्याचा प्रश्न सोडविण्यात आला. अधिक उत्पादन वाढीवर लक्ष केंद्रित झाल्याने गुणात्मक बाबींकडे दुर्लक्ष झाले. या पार्श्वभूमीवर रासायनिक शेतीला पर्याय म्हणून सेंद्रिय शेती या संकल्पनेला प्राधान्य देण्यात आले. जमिनीची सुपीकता टिकून ठेवणे, जैवविविधतेचे संवर्धन करणे आणि पुढील पिढीचे स्वास्थ्य या भूमिकेतून शेती क्षेत्रामध्ये शाश्वत विकासाचे सूत्र केंद्रस्थानी ठेवून स्थानिक संसाधनाच्या वापरातून कमी खर्चाची बिन कर्जाची शेती म्हणून सेंद्रिय शेतीकडे पाहण्याची मानसिकता निर्माण झाली. सेंद्रिय शेतीच्या बाबतीत विशेषतः देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर शाश्वत शेती म्हणून तिच्याकडे पाहिले जात आहे. कारण अन्न सुरक्षिततेविषयी विशेष दक्षता घेण्याची मानसिकता आता निर्माण होत आहे . नॅशनल प्रोग्राम ऑफ ऑर्गानिक प्रोडक्शन या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीतून शेती विकासासाठी सेंद्रिय शेती उत्पादने मानांकन, प्रमाणीकरण, तज्ञांचे मार्गदर्शन, चर्चासत्रे आणि संशोधनावर यावर भर देण्यात आला असून देशातील विविध राज्यात सेंद्रिय शेतीचे प्रयोग सुरू झाले आहेत.भारतातील शेतीच्या प्रगती मध्ये आणि निर्यातीमध्ये वाढ होऊन परकीय चलन प्राप्त करून देशाच्या आर्थिक विकासाला हातभार लावण्यासाठी सेंद्रिय शेती महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे.**

**संशोधन लेखनाची उद्दिष्टे :-**

1. **सेंद्रिय शेती संकल्पना, स्वरूप व सद्यस्थिती अभ्यासने.**
2. शाश्वत ग्रामीण विकासासाठी **संेद्रीय शेतीतील रोजगार संधी जाणून घेणे.**

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 3, March 2024

**संशोधन पद्धती :-**

**प्रस्तुत संशोधन लेखातील माहिती सेंद्रिय शेती विषयक संदर्भ पुस्तके, शासकीय माहिती व मासिके ,,वर्तमान पत्रातील लेख, इंटरनेट चा आधार घेऊन जमा केलेली आहे. सेंद्रिय शेती काळाची गरज बनत चाललेले आहे. रासायनिक शेती कडून सेंद्रिय शेतीकडे वाटचाल करून शेती क्षेत्राचा शाश्वत विकास करण्यासाठी आणि रोजगार निर्माण करण्यासाठी सेंद्रिय शेती कशाप्रकारे उपयोगी ठरेल हे या लेखात मांडले आहे.**

**सेंद्रिय शेती अर्थ व व्याख्या**

**सेंद्रिय शेती ही शाश्वत शेतीची पद्धत असून ती निसर्गातील विविध तत्त्वांवर अवलंबून आहे. सेंद्रिय शेती म्हणजे सध्याच्या शेतीशी तुलना करता खूप कमी खर्चाची ही शेती पद्धती आहे कोणतेही रासायनिक खत किंवा इतर रासायनिक संसाधने न टाकता जमिनीतून स्वच्छ सुंदर निकोप स्वादिष्ट** पौष्टिक **कसदार** विषमुक्त **असे धान्य भाजीपाला फळे दूध पाणी हवा पर्यावरण निसर्गतः उपलब्ध करणे केवळ सेंद्रिय शेतीतूनच शक्य आहे .**

- **ज्या शेती पद्धतीत रासायनिक खते कीटकनाशके आणि तणनाशके यांचा वापर टाळून नैसर्गिक खतांचा वापर व जैविक पद्धतीने कीटकांचा नाश** केला जातो **त्या शेती पद्धतीस सेंद्रिय शेती म्हणतात.**
- **शेतातील काडीकचरा पालापाचोळा यांचा खतासारखा वापर होत जाऊन कालांतराने होत जाणारी स्वयं विकसित आणि स्वयंपोषी शेती म्हणजे सेंद्रिय शेती होय.**
- **सेंद्रिय शेती म्हणजे निसर्गाच्या सिद्धांतावर आधारित पर्यावरण स्नेही जीवनशैली अंगीकारणे होय. फक्त रासायनिक निविष्ठां**ना **नकार देणे नाही तर सर्व जीवमात्रांचे आणि पंचमहाभूतांचे ऐक्य आणि परस्पर संबंध यांचा विचार करून केलेली शेती होय.**

**थोडक्यात सेंद्रिय शेती पद्धती ही विविध पिकांच्या विविध प्रकारच्या पीक पद्धतीवर आधारित असून ती पर्यावरणाशी** साधर्म्य राखून **चिरस्थायी उत्पादन देणारी सामाजिक दृष्ट्या प्राणिमात्रांचे हित जोपासून सकस व सुरक्षितता देणारी समृद्ध पद्धती होय. सृष्टीचा समतोल राखण्यास मदत करणारी शेती पद्धत म्हणून सेंद्रिय शेती मोठ्या प्रमाणावर केली जात आहे.**

**सेंद्रिय शेतीचा इतिहास :-**

**सेंद्रिय शेतीला खूप मोठा इतिहास असला तरी मध्यंतरीच्या काळात ही संकल्पना लोक पावली होती व तिची जागा रासायनिक शेतीने घेतली होती परंतु अलीकडच्या काळामध्ये सेंद्रिय शेती शिवाय शाश्वत शेतीचा दुसरा मार्ग नाही हे लक्षात आले आहे म्हणून सेंद्रिय शेती अलीकडच्या काळात अत्यंत गरजेची अशी संकल्पना बनली आहे जपानमध्ये मासानोबु फुकुओका यांनी नैसर्गिक शेतीच्या माध्यमातून जगापुढे एक आदर्श शेती**

पद्धतीचा वापर करून दाखविला आहे त्यांनी आपल्या एका काळाचे क्रांती या पुस्तकामध्ये नैसर्गिक शेती पद्धतीचे सखोल वर्णन करून शेती पद्धत कशाप्रकारे शाश्वत आहे हे सिद्ध केले आहे फ्रान्समधील जीपनेप, जर्मनीतील हान्सबेबा व हेरमन आंद्रे यांनी ही नैसर्गिक शेतीचा अवलंब केला.

अमेरिकेमध्ये 1980च्या दशकात सेंद्रिय शेतीची संकल्पना रुजली गेली तर 1990च्या दशकात ऑस्ट्रेलिया न्यूझीलंड व फिलिपाइन्स या देशांमध्येही सेंद्रिय शेती विकसित झालेली आढळते.

**भारतात सेंद्रिय शेतीची सुरुवात :-**

आधुनिक सेंद्रिय शेतीचे जनक म्हणून सर अल्बर्ट र हॉवर्ड यांना मान दिला जातो.त्यांनी सुमारे तीस वर्ष भारतात संशोधन करून काही मूलभूत सिद्धांत प्रस्थापित केले फ्रेंड्स रुरल यांनी मध्य प्रदेशातील होशंगाबाद जिल्ह्यात सेंद्रिय शेतीचा प्रयोग केला. हा प्रयोग देशातील सेंद्रिय शेती संदर्भातील एक आरंभीचा प्रयोग म्हणून ओळखला जातो. पश्चिम बंगालमध्ये टागोर ग्रामीण विकास संघटना या संस्थेने डॉक्टर मृणाल कांती यांच्या अध्यक्षतेखाली भोलापूर येथे सेंद्रिय शेती पद्धतीचा यशस्वी प्रयोग केला. कर्नाटक मध्ये धारवाड जिल्ह्यात पन्नास शेतकऱ्यांनी एकत्र येऊन शेती करण्यासाठी एक क्लब स्थापन केला.

महाराष्ट्रात श्री मोहन धारियांसारखे सामाजिक कार्यकर्ते वनशेतीसाठी प्रयत्नशील आहेत. डहाणू येथील श्री मदन बाफना वगैरे अनेक मंडळी नैसर्गिक शेती पद्धतीच्या विकासासाठी प्रयत्नशील आहेत. महाराष्ट्र राज्यात सेंद्रिय शेती योजनेपाठोपाठ जानेवारी 2013 रोजी सेंद्रिय शेती धोरणाला शासनाने मंजुरी दिली आहे. राज्यात केंद्र आणि राज्य पुरस्कृत वसंतराव नाईक शेती स्वावलंबन योजना सेंद्रिय शेतीला उत्तेजन देण्यासाठी राबवली जात आहे. महाराष्ट्र शासनातर्फे पुणे येथे मॉफ,धुळे येथे सर्ग, नाशिक येथे ग्लोबल यासारख्या सेवाभावी संस्थांना सेंद्रिय मालाचा दर्जा राखून प्रमाणीकरण करण्याची व्यवस्था करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आलेले आहे.

अलीकडेच संयुक्त राष्ट्राच्या अन्न व कृषी संघटनेचा ' फ्युचर पॉलिसी गोल्ड अवार्ड 'आणि जगातील पहिले संपूर्ण सेंद्रिय शेती असलेले राज्य ठरण्याचा मान भारतातील सिक्कीम या राज्याला मिळाला आहे.

**सेंद्रिय शेतीची सद्यस्थिती :-**

जागतिक स्तरावर प्रमाणित सेंद्रिय शेती करणाऱ्या देशांची व शेतकऱ्यांचे संख्या दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे स्विस राज्य सचिवालय, जागतिक व्यापार केंद्र, आयफॉम संघटना आदी विविध स्रोतांद्वारे याबाबतचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. त्यांच्या 2017 च्या सर्वेक्षण अंदाजानुसार 2015 पर्यंत सेंद्रिय अन्नपदार्थांची जागतिक बाजारपेठ 81.6 अब्ज अमेरिकी डॉलर्स म्हणजेच 75 अब्ज युरो डॉलर्स इतकी वाढली आहे. यामध्ये अमेरिका देश आघाडीवर आहे.

आशिया खंडातून बहुतांशी प्रमाणित नारळ, कॉफी, चहा, काजू ,सफरचंद, लिची तसेच मसाल्याचे पदार्थ यूरोपीय व अमेरिकी देशांमध्ये पाठविले जातात. युरोप खंडामध्ये प्रमाणित सेंद्रिय उत्पादनांचे प्रमाण वर्षागणिक वाढताना दिसत आहे. तसेच सेंद्रिय उत्पादनांचा वापर करण्याचे प्रमाणही युरोपात मोठ्या प्रमाणात आहे. युरोप खंड शक्यतो बाहेरील देशांकडून कच्चामाल आयात करतो तर प्रक्रियायुक्त माल निर्यात करण्यात युरोपचा वाटा मोठा आहे. प्रक्रियायुक्त फळांचे ज्यूस, चॉकलेट, पुरक प्रथिने युक्त आहार, अॉलिव्ह अॉइल, सेंद्रिय प्रमाणित मद्य, सेंद्रिय सौंदर्यप्रसाधने आदी उत्पादने युरोप द्वारे आशिया, अमेरिका व आफ्रिका खंडात मोठ्या प्रमाणात निर्यात केली जातात.

भारतात अपेडा संस्थेद्वारे मान्यताप्राप्त 28 प्रमाणीकरण संस्थांद्वारे सेंद्रिय प्रमाणीकरण कार्यक्रम राबविला जातो. त्यासाठी केंद्र सरकारने सेंद्रिय शेतीचा राष्ट्रीय कार्यक्रम( नॅशनल प्रोग्रम फोर ऑर्गानिक प्रोडक्शन) NPOP ऑक्टोबर 2001मध्ये अमलात आणला. विविध कृषी हवामान क्षेत्रांमध्ये सर्व प्रकारच्या सेंद्रिय उत्पादनांच्या वाढीला देशात मोठी संधी आहे. देशातील बहुतांश भागांमध्ये पारंपरिक पद्धतीने शेती केली जाते. हा सर्वात मोठा फायदा सेंद्रिय शेतीसाठी म्हणायला हवा. सेंद्रिय उत्पादकांना बाजारपेठेच्या मागणीनुसार पुरवठा करणे शक्य होत आहे. त्यामुळे स्थानिक बाजारपेठेत निरंतर वाढत आहे. सहाजिकच आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील तिची वाढ निर्यातीच्या माध्यमातून होत आहे. भारताने सन 2016 -2017 मध्ये 180105.812 मे. टन प्रमाणित सेंद्रिय मालाचे उत्पादन केले. यात तेलबिया, धान्य, बाजरी, औषधी वनस्पती,कापूस, डाळी,चहा, फळे, मसाले, सुका मेवा, भाजीपाला, कॉपी आदींचा समावेश आहे.

अपेडा संस्थेने 2017 मध्ये उपलब्ध केलेल्या माहितीप्रमाणे भारतात प्रमाणित सेंद्रिय शेती करणारे एकूण शेतकरी 1.09 दशलक्ष आहेत. त्यात 1512 शेतकरी वैयक्तिक प्रमाणित सेंद्रिय शेती करतात. तर 3315 शेतकरी गटाद्वारे सेंद्रिय प्रमाणीकरण प्रक्रियेत समाविष्ट आहेत. सेंद्रिय उत्पादनावर प्रक्रिया करणारे 885 प्रक्रियादार आहेत. सेंद्रिय मालाचा व्यापार करणारे 898 व्यापारी( ट्रेडर्स ) आहेत. तर सेंद्रिय पद्धतीने वन्य उत्पादनांचे संकलन करणारे 64 गट या प्रक्रियेत समाविष्ट आहेत.

केंद्र सरकारच्या सेंद्रिय शेती संबंधी राष्ट्रीय कार्यक्रमाद्वारे (एन. पी.ओ.पी. )महाराष्ट्रात एकूण 2923091.7 हेक्टर क्षेत्र सेंद्रिय प्रमाणीकरण अंतर्गत आहे. यात पूर्णता सेंद्रिय प्रमाणीकरण क्षेत्र 84338.4 हेक्टर असून रूपांतर अवस्थेत 139668.7हेक्टर क्षेत्र आहे. याहे यामध्ये तेलबिया, डाळवर्गीय पिके आदींचा प्रामुख्याने समावेश आहे. यातील बहुतांश उत्पादने अमेरिका व आखाती देशांमध्ये निर्यात केली जातात. महाराष्ट्र सध्या मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, कोल्हापूर सोलापूर या शहरांमध्ये सेंद्रीय बाजारपेठ वाढताना दिसत आहे.

सेंद्रिय शेतीचे महत्त्व :-

शेतीची व्यवस्था जमीन हवा आणि पाणी या त्रिसूत्रीवर अवलंबून आहे. निसर्गातील निसर्गातून घेतलेले निसर्गालाच परत केले पाहिजे. निसर्गचक्र विस्कळीत करून चालणार नाही. पूर्वी धान्य उत्पादन

वाढविण्याची गरज होती त्यावेळी आपण रासायनिक शेतीचा आधार घेतला. परंतु त्याचा अतिरेक होऊन मानवी आरोग्य व पर्यावरणीय समतोल व शेतमालाची गुणवत्ता धोक्यात येत आहे. त्यामुळे हे धोके टाळण्यासाठी सध्या सेंद्रिय शेतीचा प्रचार आणि प्रसार आवश्यक झाला आहे.

सेंद्रिय शेतीमुळे पुढील बाबी घडून येतात

- नैसर्गिक चक्राचा समतोल करता येईल.
- जमिनीचा पोत व दर्जा उंचावला जाऊन जमिनीची सुपीकता टिकविता येईल.
- सेंद्रिय खतांमुळे जमिनीत अन्नघटकांची उपलब्धता वाढते.
- सेंद्रिय शेतीमाल आरोग्यवर्धक असल्याने मानवी जीवन निरोगी राहण्यास साह्य होईल.
- पर्यावरणाचा रास थांबवणे शक्य होईल.
- शेतीत रासायनिक कीटकनाशकांचा वापर थांबविता येईल.
- प्रदूषण कमी करण्यासाठी सेंद्रिय पद्धतीमुळे हवा, जल, आणि मृदा प्रदूषण थांबवणे शक्य होईल.
- शेतीतील काडीकचरा पालापाचोळा शेतीतील पिकांचा शिल्लक भाग यांचा खतासाठी उपयोग झाल्याने सेंद्रिय शेती पद्धतीत उत्पादन खर्च कमी राहतो.
- सेंद्रिय शेतीमालाची पौष्टिकताअधिक असल्याने मानवी शरीरास सकस व संतुलित आहार मिळतो.
- सेंद्रिय शेती पद्धतीत उत्पादन खर्च कमी होत असल्याने शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा कमी करता येईल, त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही काही प्रमाणात थांबविणे शक्य होईल.
- जमिनीचा पोत सुधारून जमिनीची उत्पादन क्षमता टिकविण्यास साहय होईल.
- निसर्गातील पशुपक्ष्यांच्या नामशेष होणाऱ्या प्रजातींचे रक्षण करता येईल.
- उत्पादन खर्च कमी झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या नफ्यात वाढ होईल व शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी साह्य होईल.
- शेतीत वापरावयाच्या निविष्ठा (खते,औषधे) विकत न घेता घरीच तयार केल्यामुळे स्वंयरोजगार निर्मिती होईल.
- सेंद्रिय शेतीत वापरावयाच्या निविष्ठा व औषधे निर्माण करण्यासाठी शेतकऱ्यांना स्वतःला आणि इतरांना ही रोजगार उपलब्ध करता येईल.
- शेतकऱ्यांना स्वावलंबी बनवणारी सेंद्रिय शेती ही शाश्वत आर्थिक विकासाचे एक महत्त्वाचे आर्थिक साधन ठरेल.

सेंद्रिय शेती आणि रोजगार व स्वयंरोजगार निर्मिती :-

हरित क्रांतीनंतर 'ग्रो मोअर' भरपूर पिकवा चा नारा सुरू झाला. शेती एक किंवा दोन हंगामी न राहता तो वार्षिक व्यवसाय झाला. एका जमिनीमधून वर्षातून जास्तीत जास्त पिके घेण्याचा प्रयत्न होऊन

**जमिनीतून जास्तीत जास्त उत्पादन घेण्याची जीवघेणी स्पर्धा सुरू झाली. त्यासाठी मजुरांची कमतरता भासली मशागतीसाठी बैलांऐवजी यांत्रिकीकरणाची गरज वाटू लागली. ट्रॅक्टर आणि इतर स्वयंचलित यांत्रिक बाबींचा व अवजारांचा वापर होऊ लागला. परंतु त्यामुळे मानवी श्रमाचा वापर कमी होउन बेकारी निर्माण झाली व रोजगार संधी कमी झाल्या.**

**वाढत्या यांत्रिकीकरणामुळे पर्यावरणाला बाधा पोचली व नैसर्गिक निसर्ग चक्रात मानवी हस्तक्षेप वाढला. तसेच खेड्यातील शेतकऱ्यांचा पैसा मोठ्या प्रमाणात कारखानदारांपर्यंत पोहोचला व शेतीचे व्यापारीकरण मोठ्या प्रमाणात घडून आले आणि स्वावलंबी असणाऱ्या खेड्यांचे ( गावांचे ) रूपांतर परावलंबी खेड्यांमध्ये ( गावांमध्ये )झाले. गावोगावी चालणारी बारा बलुतेदारी पद्धत बंद झाली बारा बलुतेदार पद्धतीमध्ये गावातील गरजा गावातच भागवल्या जात. शेतीसाठी लागणारी अवजारे गावातल्या गावात उपलब्ध होत असत त्यांच्या निर्मितीतून गावातील लोकांना रोजगार उपलब्ध होत असे. परंतु यांत्रिकीकरणामुळे अनेक छोटे-मोठे उद्योग व उद्योगधंदे बंद झाले आणि बेकारी वाढली.**

**सेंद्रिय शेतीमुळे पुढील प्रकारच्या रोजगार व स्वयंरोजगार संधी** निर्माण **होत आहेत**

- **गांडूळ खत निर्मितीउद्योग.**
- जीवाणूजन्य **खत निर्मिती उद्योग**
- जीवामृत, बी**जामृत,** सप्तधा**न्यांकुर** अर्क, **दशपर्णी अर्क निर्मिती.**
- **निंबोळी पावडर व निंबोळी तेल निर्मिती उद्योग.**
- **कचऱ्यापासून कंपोस्ट खत निर्मिती उद्योग.**
- **नॅडेप खत निर्मिती.**
- वनस्पतीजन्य **कीटकनाशके निर्मिती**
- तंबाखू अ**र्क, मिरची** व **लसुन** अ**र्क, कडू** निंब अर्क, **शेवगा अर्क, वेखंड अर्क, करंज व तुळस** अर्क, **एरंडी** अर्क **निर्मिती**
- **सेंद्रिय शेतमाल विक्री व्यवस्थापन ( मार्केटिंग ).**
- **सेंद्रिय गुळ निर्मिती उद्योग.**
- **सेंद्रिय अन्नधान्य व भाजीपाला निर्मिती**
- **सेंद्रिय शेतमाल निर्यातीतील संधी**
- विषमुक्त **फळे निर्मिती**
- **केमिकल विरहित सौंदर्यप्रसाधने निर्मिती**
- **केमिकल विरहित धूप, अगरबत्ती, अत्तर निर्मिती व्यवसाय**
- सेंद्रिय परसबाग, **सेंद्रिय टेरेस** व बाल्कनी **गार्डन**

- देशी गायीच्या शेण, गोमूत्र, दूध यापासून साबण व सौंदर्यप्रसाधने, दंतमंजन, **निर्जंतुकीकरण द्रव्य** निर्मिती

**इत्यादी प्रकारचे अनेक व्यवसाय अतिशय कमीत कमी भांडवल आणि ग्रामीण भागातील टाकाऊ वस्तु पासून कमी खर्चात सुरू करता येऊ शकतात. या व्यवसायातून रोजगार आणि स्वयंरोजगार निर्मिती होऊन ग्रामीण जनतेचे उत्पन्न वाढवून राहणीमानाचा दर्जा उंचावण्यास साहाय्य होईल व ग्रामीण भागाच्या** आणि शेती क्षेत्राच्या **शाश्वत विकासासाठी ही निश्चितच हातभार लागेल.**

**सरांश:-**

भारत हा खेड्यांचा देश आहे. **शेतीप्रधान भारत देशातील सुमारे 60 ते 65 टक्के जनता आजही प्रत्यक्ष - अप्रत्यक्षरीत्या शेतीवर अवलंबून आहे. हरितक्रांती नंतरच्या रासायनिक शेतीने भारतीय शेतीचे गणितच बदलून गेले. देशाला अन्नधान्याचा पुरवठा करणारी परंतु आधीच अस्मानी-सुलतानी संकट आणि अडचणीत आलेली शेती वाढत्या उत्पादन खर्चामुळे आज अडचणीत आली आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव हमीभाव मिळत नसल्याने जगण्याची हमी नसलेल्या लाखो शेतकऱ्यांनी मागच्या काही दशकांत मोठ्या प्रमाणात आत्महत्या केल्या. आणि आजही त्या सुरूच आहेत. उद्योगधंद्यांना चालना देण्यासाठी शेतकरी विरोधी धोरणे खुलेआमपणे राबवली गेल्यामुळे शेती आणि शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. शेतकरी असणे ही एकेकाळी अभिमानानं सांगायची प्रतिष्ठेची बाब होती. ती आज मानहानीकारक अवमानदर्शक बनली आहे. शेती एकेकाळी शेतकऱ्यांचा व्यवसाय नव्हता तर तो त्यांच्या जगण्याचा एक अविभाज्य भाग होता मात्र साऱ्या जगाचा पोशिंदा असलेल्या आणि गावातल्या साऱ्या उपेक्षित घटकांना सोबत घेऊन जगणाऱ्या शेतकऱ्यासमोर आज त्याच्या स्वतःच्या जगण्याचा प्रश्न बिकट बनला आहे. त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग त्याला दिसत नाही जगाच्या पाठीवरचे सगळे उपेक्षित घटक एकत्र येऊन आपल्या हक्कासाठी चा आवश्यक संघर्ष करतात. मात्र बारा महिने तेरा काळ अहोरात्र शेतीच्या कामात गुंतलेल्या आणि जगण्याची कोंडी झालेल्या, सतत विविध प्रश्नांनी घेरलेल्या शेतकऱ्याला सर्वसमावेशक सर्वव्यापी संघटित शक्ती उभी करता आली नाही.**

**शेतकऱ्यांच्या चळवळी आणि सरकारची शेतीविषयक धोरणे महात्मा फुलेंनी सांगितलेल्या मार्गाने गेली असती तर भारतीय शेतकरी आणि शेतीचे चित्र आश्वासक आणि आशादायक निर्माण झाले असते. आपले प्राधान्य मुख्यत्वे शेतीलाच असायला हवे पण ते आज माहिती तंत्रज्ञानाला आहे. परिणामी शेतीतून जगण्याची कोणतीच हमीनसल्याने जगण्याच्या संघर्षात हतबल झालेले शेतकऱ्यांची नवी पिढी पुन्हा शेतीक्षेत्राकडे वळविण्यासाठी व शेती आणि ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासासाठी सेंद्रिय शेती हाच एक उत्तम पर्याय ठरू शकतो.**

**संदर्भसूची :-**

1. झेंडे गो.का., डीएनएचे सुवर्णा अधिवेशन या अधिवेशनात सादर केलेला सखोल प्रबंध.,पुणे 2001.
2. एस. व्ही. ढमढेरे, दत्तात्रय चव्हाण, कृषी अर्थशास्त्र सेंद्रिय शेतीच्या विशेष संदर्भासह. डायमंड पब्लिकेशन पुणे. 2023
3. काटोले हर्षा, सेंद्रिय शेती कशी कराल, गोडवा प्रकाशन .2014.
4. विशेषांक ,शेती कालची आजची आणि उद्याची ,पूर्वा कृषिदूत, नाशिक, डिसेंबर 2015 .
5. सेंद्रिय शेती विशेषांक, दैनिक ॲग्रोवन, 25 नोवेंबर 2017.
6. प्रशांत नाईकवाडी, संेंद्रीय शेतमालाची वाढती जागतिक बाजारपेठ ,सेंद्रिय शेती विशेषांक ,दै.ॲग्रोवन 25 नोव्हेंबर 2017.
7. नागेश टेकाळे ,सेंद्रिय शेती :एक तप प्रयत्नाचे फळ, दैनिक ॲग्रोवन, 13 फेब्रुवारी 2016.
8. सेंद्रिय उत्पादने निर्मितीतून राजाभाऊ झाले उद्योजक, दैनिक ॲग्रोवन, 24 फेब्रुवारी 2015.
9. शेती भारत आणि जग, दैनिक ॲग्रोवन, शनिवार 21 एप्रिल 2018.
10. सेंद्रिय शेती विशेषांक, गोडवा पुणे, ऑक्टोबर 2015.
11. विकिपीडिया सेंद्रिय शेती विषयक माहिती.